# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ६३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०३/१०/२०१६

**१) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिविगाळ व जिवाने मारण्याची धमकी दिली. :–**

दिनांक ०१/१०/२०१६ रोजी २०.४५ वा. दर. यातील फिर्यादी ओमप्रकाश उर्फे गोलु इस्तारी धुर्वे वय २२ वर्ष, रा. उमरी हा साकोली वरुन सेंदुरवाफा कडे जात असतांना काही कारण नसतांना यातील आरोपी क्र. १ ने भांडण करुन अश्लिल शब्दात शिविगाळ केले व आरोपी क्र. २,३,४ यांनी शिविगाळ करुन जिवेमारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६,३२३,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन लाथाबुक्यांनी मारपीट करुन जिवे मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक ०२/१०/२०१६ रोजी १३.१५ वा. दर. यातील फिर्यादी जयवंत सुधाकर बुधे वय ४६ वर्ष, रा. गोपेवाडा हा गावातील चौकात सार्वजनीक ठिकाणी असलेल्या पानठेल्यावर चहा पिण्याकरीता जावुन बसला असता यातील आरोपी क्र. १ तेथे येवुन फिर्यादी यास विनाकारन पुष्कळ नाव कमावलास रे असे बोलुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन तोंडातोंडी भांडण केले व भांडण सुरु असतांना आरोपी क्र. २,३,४ हे तिथे आले व माझ्या वडीला सोबत भांडण का करतोस असे म्हणुन लाथाबुक्याने मारहान करुन जिवाने मारपिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २९४,५०६,५०४,३२३,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) लायसंस नसतांनी अवैध सावकारी धंदा करीत असल्याने गुन्हा नोंद . :–**

८ ते १० महीण्या पुर्वी ते आज पर्यत यातील फिर्यादी प्रशांत विनायक जाभोरकर वय ४९ वर्ष, रा. सिवील लाईन भंडारा कॉटर क्र. डी ३५ टेलीफोन ऑपरेटर भंडारा याने आरोपी कडुन ८ ते १० महीन्यापुर्वी २०,०००/–रु. दर महा १० टक्के व्याजाने घेतले होते व्याजाची रक्कम फिर्यादीने आरोपीला परत केली होती पण आरोपीने कर्जाची रक्कम शिल्लक आहे असे सांगुन सतत पैसे देणे बाबत दरमहा व्याज लावत होता आरोपी कडे सावकारी लायसंस नसतांनी शासनाने निर्धारीत केलेले सावकारी व्याज दरापैकी अवैध व्याज दराने व्याज आकारुन अवैध सावकारी करीत असल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३९,४४,४५ महा.मनी.लॅड्रीग रेगुलेशन ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.